पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २०८**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १७/०२/२०२१** **वेळ – दु.०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **१७/०२/२०२१** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहुल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

याशिवाय मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त(१), मा.अजित पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवार – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे, मा.खाबडे – सह शहर अभियंता, मा.लडकत – प्र.सह शहर अभियंता, मा.देशमुख, मा.शिंदे, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.पाटील – प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता YCMH, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.मोरे, मा.पाटील, मा.वाघुंडे, मा.काळे, मा.टकले – कार्यकारी अभियंता, मा.हराळे, मा.देशमुख, मा.पानसरे, मा.तावडे – प्रशासन अधिकारी तथा प्रभारी क्षेत्रिय अधिकारी, मा.बहुरे, मा.मेमाणे – प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे – सहा.आरोग्य/वैद्यकिय अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.७९) मोशी कचरा डेपोतील जुन्या डंपिंग केलेल्या कच-याचे बायोमायनिंग करणे बाबतचा ठराव क्र.८४१५ विषय क्र.५४ दि.१०/२/२०२१ मध्ये दुरूस्ती करणेबाबत. – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील महानरपालिकेच्या मालकीची सार्वजनिक वाचनालय बचत गटांना सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत. -– मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८१) नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला दिन साजरा करणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८२) नागरी सुविधा केंद्र स्थालांतर करणेस मान्यता मिळणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४ दि.१६/०२/२०२१ ला मान्यता देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८४) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अ प्रभाग नगरसदस्यांचा माहे मार्च/ एप्रिल २०२१ मध्ये चंदिगढ येथे आयोजित करणेत येणा-या अभ्यास दौ-याचे खर्चास मान्यता देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८५) फ प्रभाग समिती सदस्यांना स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगरसदस्यांचा जम्मू व काश्मिर येथे आयोजित करणेत येणा-या अभ्यास दौ-याचे खर्चास मान्यता देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८६) सौ.श्रृतिका प्रथमेश मुंगी यांची महापालिकेत्या माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये सीएसआर सहाय्यक सल्लागार या पदावर कालावधी वाढणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा प्रभाग क्र.२५ येथील पुनावळे गावठाण व्यायामशाळा ही रणखांब मित्र मंडळ पुनावळे कोयते वस्ती ता.मुळशी, जि.पुणे या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८८) मा.स्थायी समिती सभा आयोजनाबाबत. - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२०६) दि.०३/०२/२०२१ व ०८/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२०७) दि.१०/०२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ८४२८ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/३३४/२०२०, दि.२१/१०/२०२०

विषय - Covid 19 Jumbo Facilities Center उभारणेबाबतचा निधी मिळणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४२९ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/०८/०२/२०२१, दि.२८/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं.१६ आकुर्डी हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणे (टप्पा २)[ब स्थापत्य विषयक कामे,(क) फर्निचर विषयक कामे] या कामासाठी वास्तूविशारद/प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेबाबत सदर प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण असले कारणाने नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिद्ध करणे तसेच निविदा पुर्व व निविदा पश्चात ही सर्व कामे करणेसाठी वास्तुविशारद तसेच प्रकल्पावर देखरेख ठेवणे, दैनंदिन मोजमाप घेणे, देयके तपासणे या कामासाठी प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबत मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर/ सल्लागार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यासाठी दि.२९/०९/२०२० रोजी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत दि.०३/१०/२०२० रोजी पर्यंत एकूण ०३ सीलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. सदर कोटेशन दि.०५/१०/२०२० रोजी ३.०० वाजता उघडण्यात आले असून त्याअनुषंगाने ३ सिलबंद कोटेशन यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर करण्यात आला आहे. सदर तूलनात्मक तक्यानुसार मे.शशिप्रभू असोसिएट यांनी लघुत्तम दर 2.00% (जीएसटी सोडून) सादर केल्याचे दिसून येते, सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं.१६ आकुर्डी हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणे. (टप्पा २) [ब स्थापत्य विषयक कामे,(क) फर्निचर विषयक कामे] वास्तूविशारद/ सल्लागार नेमणूक करणेबाबत या कामासाठी मे.शशिप्रभू असोसिएट यांची लघुत्तम दर 2.00% नुसार निविदापूर्व व निविदापश्चात वास्तूविशारद व प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत व त्याकामी येणारी फी 2.00 % (जीएसटी सोडून) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३० विषय क्रमांक – ०३
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य BRTS
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/१०७/२०२१, दि.०२/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.29/08/2020-2021 अन्वये निगडी-दापोडी या बीआरटीएस कॉरीडॉर वरील डेडीकेटेड लेनची व बस स्टॉपची दुरुस्ती अनुषंगिक कामे करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.1,48,23,968/- (अक्षरी र.रु.एक कोटी अठ्ठेचाळीस लाख तेवीस हजार नऊशे अडूसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,47,86,168/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,47,86,168/- पेक्षा 34.00% कमी म्हणजेच र.रु.97,58,871/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.37,800/- = एकुण र.रु.97,96,671/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३१ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/७३/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.7/29/2020-2021 अन्वये सन २०१८-१९ साठी जलक्षेत्र क्र.बी/५ अंतर्गत वाल्हेकरवाडी येथे स्पाईन रोड लगत डिझाईन प्रमाणे डी.आय वितरण नलिका पुरविणे व टाकणेकामी के पी कन्स्ट्रक्शन नि.र.रू.31,42,174/- (अक्षरी र.रु.एकतीस लाख बेचाळीस हजार एकशे चौ-याहात्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.31,42,174/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.31,42,174/- पेक्षा 18.99% कमी म्हणजेच र.रु.25,45,475/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.25,45,475/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३२ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

विषय - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२२ दि.२८/०१/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी जलतरण तलाव व्यायामशाळा व पिंपरी कॅम्प व्यायामशाळा सेवा शुल्क तत्वावर कराराने

चालविणेस देणेबाबत..

विषय क्र.५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३३ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – उद्यान

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/८५/२०२१, दि.११/०२/२०२१

विषय - मनपाचे ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.३० मधील विविध उद्याने देखभाल करणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३४ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – भूमि आणि जिंदगी

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुजि/८/कावि/१२/२०२१, दि.२५/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आण्णासाहेब मगर स्टेडीयम समोरील इमारतीचे भाडे प्रति महा र.रु.८,७७,०२९ निश्चित केले असून त्यास मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून मंजुरी मिळालेली आहे. मे.जिल्हा व सत्र न्यायालय पुणे यांचे पत्र क्रमांक १८४५/२०१९, दि.७/३/२०१९ अन्वये न्यायालयास आवश्यक कार्यालय व फर्निचर यांचे प्रारुप आराखडे तयार करुन त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यानुसार आवश्यक असणारे फर्निचर व त्यानुसार प्रारुप आराखडे मे.न्यायालयाला सादर करणेत आलेले आहेत तर सदर फर्निचर करीता येणारे पाच कोटी खर्चास मा.महापालिका सभा ठराव क्र.४२२, दि.२० जून २०१९ अन्वये प्रशासकिय मान्यता घेतलेली आहे. कार्यकारी अभियंता (सा. बा. विभाग पुणे) यांना सदर खर्चानुसार फर्निचरचे वाजवी भाडे निर्धारीत करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. सा.बा.विभागाने फर्निचरचे भाडे निर्धारित केले जात नसल्याबाबत समक्ष सांगितल्यानुसार मनपाचे उप संचालक नगररचना यांचेकडून फर्निचरचे भाडे निर्धारित करणेत आलेले आहे, त्यानुसार सा.बा.विभागाने निव्वळ जागेचे ठरविलेले भाडे र.रु.८,७७,०२९/- व उप संचालक नगररचना यांनी फर्निचर करीता होणा-या संभाव्य खर्चानुसार र.रु.४,२६,२००/- भाडे निर्धारित केलेले आहे. सदर भाडे योग्य असलेबाबत सा. बा. विभाग पुणे यांनी २७/२/२०२० चे पत्रानुसार कळविले आहे. या प्रमाणे एकुण र.रु.१३,०३,२२९/- (अक्षरी र.रु.तेरा लाख तीन हजार दोनशे एकोणतीस फक्त) आकारणी केलेली आहे. व सदर भाडे मे.न्यायलयास फर्निचरच्या आराखड्यासह कळविलेले आहे. पिंपरी चिंचवड अँडव्होकेट बार असोशिएशन यांनी फर्निचर सह मनपाने कळविलेले भाडे देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने असमर्थता व्यक्त केल्याने कोर्ट स्थलांतराचा प्रश्न गंभारी होत आहे असे कळविले आहे याबरोबरच मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८०८९, दि.१३/०१/२०१९ नुसार सदर इमारत फर्निचरसह नाममात्र भाडे दराने देण्यास मान्यता देणेत आलेली आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७९ ड नुसार प्रचलित बाजारभावानुसार भाडे घेणे

आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोशिएशन यांची मागणी व मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८०८९, दि. ३/०१/२०१९ मधील आशय पाहता पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये नागरीकांची निकड लक्षात घेता मनपाचे वतीने फर्निचर करुन देण्यास व सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेले व मे.न्यायलायाने मान्य केलेले र.रु.८,७७,०२९/- भाडे आकारुन मे.न्यायलयास जागा देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३५ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – इ क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.इक्षका/वि/३६/२०२१, दि.१२/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत भोसरी गावठाण प्रभाग क्र.७ मधील सर्व्हे क्र.१ येथे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्राची स्थापत्य विभागामार्फत उभारणी करणेत येत आहे. सदर केंद्राच्या इमारतीमधील वीजसंचमांडणीस उच्चदाब वीजपुरवठा करणेकामी व वीजभार मंजुरीबाबत म.रा.वि.वि.कंपनीकडे पत्रव्यवहार केला असता त्यांचेकडील प्राप्त मंजुर कोटेशन/अंदाजपत्रका नुसार (ग्राहक क्र.170149052150) (SE/GKUC/T/HT/NEW/DDF-1.3%/Bhosari/20-21/151/00402 Date 25/01/2021) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.३% पर्यवेक्षकीय शुल्क र.रु.२३,९९१/- सुरक्षा ठेव र.रु.१३,०४,९८२/- व इतर चार्जेस असे एकुण र.रु.१३,४१,३५०/- अदा करणेस कळविले आहे. सदरची रक्कम म.रा.वि.वि. कंपनीस अदा करणे आवश्यक आहे. सदरचा खर्च विद्युत मुख्य कार्यालयाकडील म.रा.वि.वि.कं.लि/महापारेषण/त्रयस्थ संस्थाकरीता सुपरव्हीजन चार्जेस व विद्युत निरिक्षण फी अदा करणे या महसुली लेखाशिर्षामधुन करणेत येणार आहे. सदर ठिकाणी उच्चदाब वीजपुरवठा घेणे व वीजभार मंजुरीकामी म.रा.वि.वि. कंपनीकडील प्राप्त मंजुर अंदाजपत्रका नुसार १.३% पर्यवेक्षकीय शुल्क र.रु.२३,९९१/- सुरक्षा ठेव र.रु.१३,०४,९८२/- व इतर चार्जेस असे एकुण र.रु.१३,४१,३५०/-(अक्षरी र.रू.तेरा लाख एक्केचाळीस हजार तीनशे पन्नास फक्त) म.रा.वि.वि.कंपनी लिमिटेड यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३६ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.माध्य/शि/५/कावि/१३३/२०२१, दि.१२/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी श्रीम.अश्विनी अमोल वाघमारे, स्पारकल क्लासेस पुणे यांचेमार्फत हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविणेकामी येणारा खर्च र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८४३७ विषय क्रमांक – १०

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/५२/२०२१, दि.१५/०१/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या दुरसंचार विभागाकडील नि.नो.क्र 26/04-2020/21 अन्वये सर्व कार्यालये ISDN-PRI LINE ने जोडणे व बिल अदा करणेकामी मे.टाटा टेलि सर्व्हीसेस लि नि.र.रू.96,00,000/- (अक्षरी र.रू.शहान्नव लाख फक्त) पेक्षा AT PAR या दराने ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३८ विषय क्रमांक – ११

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३९/२०२१, दि.०१/०२/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना वमनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टाउपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादारांना अदा कराव्या लागणा-या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद कालावधीमध्ये होणा-या र.रू.17,28,000/- (अक्षरी र.रू. सतरा लाख अठ्ठावीस हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.जोशी बंधू केटरर्स यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४३९ विषय क्रमांक – १२

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.सह शहर अभि.(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/१५१/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.सह शहर अभि.(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.36/1-2020/21 अन्वये मनपाच्या क्षेत्रीय कार्यालये, विविध प्रकारच्या इमारती, सबस्टेशन, नाटयगृहे, रुग्णालये व दवाखाने इ. ठिकाणी ऍटोमॅटीक फायर

एक्सस्टींग्युशर बसविणेकामी मे.जिजाई एंटरप्रायजेस नि.र.रू.44,62,650/- (अक्षरी र.रू.चव्वेचाळीस लाख बासष्ठ हजार सहाशे पन्नास फक्त) पेक्षा 1.50% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४० विषय क्रमांक – १३

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२७३/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/55/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी मधील हजारेवस्ती व आल्हाट वस्ती परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.ए.आर.संगतानी नि.र.रू.41,22,211/- (अक्षरी र.रू.एक्केचाळीस लाख बावीस हजार दोनशे अकरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,49,911/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,49,911/- पेक्षा 28.99% कमी म्हणजेच र.रु.28,75,842/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.17,243/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.29,65,385/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४१ विषय क्रमांक – १४

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – वायसीएमएच

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१०७/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता अस्थायी स्वरूपातील वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ डॉक्टरांच्या रिक्त पदांकरीता दि.१८/०१/२०२१, व दि.२५/०१/२०२१ रोजीचे Walk In Interview करीता उपस्थीत उमेदवारांमधुन वरिष्ठ निवासी-२, कनिष्ठ निवासी-६, वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु-२ व शिफ्ट ड्युटी-१ असे एकूण- ११ उमेदवारांची निवड करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या वरिष्ठ निवासी-२, कनिष्ठ निवासी-६, वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु-२ व शिफ्ट ड्युटी-१ उमेदवारांची दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात आदेशाचे तारखेपासून नियुक्ती करणे व त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४२ विषय क्रमांक – १५

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/१३३/२०२१, दि.०८/०२/२०२१

विषय - ऑटो क्लस्टर (DCH) संचालित स्पर्श हॉस्पीटल यांचे अतिरिक्त मनुष्यबळाबाबत...

विषय क्र.१५ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४३ विषय क्रमांक – १६

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/७९/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सध्या कोराना (Covid-19) या साथरोगाने थैमान घातलेले आहेत दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत चाललेली आहे. त्यामुळे उपलब्ध यंत्रणा अपुरी पडत आहे. यासाठी मा.आयुक्त यांचे मान्यतेने महानगरपालिकेच्या वतीने अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे ८०० बेडसाठी जंबो रुग्णालाय उभारणेत आलेले आहे. सदर रुग्णालय सध्या तयार झालेले आहे. रुग्णालयामध्ये तयार करणेत आलेल्या लॅबोरेटरी साठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने, भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार कोरोना (COVID 19) या साथीच्या रोगावर उपचारासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७ (३) (क) नुसार तात्काळ खरेदी करणेसाठी EOI प्रसीध्द करणेत आले होते. याकामी मा.आयुक्त यांची दिनांक २६.०८.२०२० चे प्रस्तावान्वये मान्यता घेणेत आलेली होती. त्या प्रमाणे EOI (Expression Of Interest) प्रसीध्द करणेत आलेले होते. सदर EOI (Expression Of Interest) स्विकारणेकामी दिनांक २८.०८.२०२० रोजी सकाळी ११ वजेपर्यंत मुदत देणेत आलेली होती. EOI मध्ये Pathologist And Lab Technicians यांचे दर मागविणेत आले होते परंतू जंबो कोविड रुग्णालयामध्ये फक्त Lab Technicians ची आवश्यकता असलेने त्यांचेच दर ग्राह्य धरणेत आलेले आहेत. मुदतीमध्ये दोन संस्थांनी बंद पाकीटामध्ये कागदपत्रे आणि दरपत्रके सादर केलेली होती. या मध्ये मे.माहेश्वरी सेल्स कॉर्पोरेशन आणि मे.रुबी अलकेअर सर्व्हीसेस या दोन संस्थांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. मे.माहेश्वरी सेल्स कॉर्पोरेशन, दर लघुत्तम प्राप्त झालेले असुन ते पुढील प्रमाणे आहेत

| Name Of Party | Staff Position | No of Staff | Cost Per Staff Per Day (INR) | Total Cost Per Day (INR) | Total Cost Per Month (INR) | Total Cost for 6 Month |
|---|---|---|---|---|---|---|
| Maheshwari Sales Corp | Lab Technicians | 12 | 850 | 10200 | 3,06,000 | 18,36,000.00 |

वरील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत. लघुत्तम दरपत्रकधारक मे.माहेश्वरी सेल्स कॉर्पोरेशन यांना काम चालु करणेस सांगण्यात आले होते. त्या प्रमाणे त्यांचे कामकाज अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालयत चालु केले होते. त्या प्रमाणे त्यांचे लघुत्तम दरा प्रमाणे सहा महीन्यासाठी Lab Tech. पुरविणेकामी एकूण र.रु.१८,३६,०००/- (अक्षरी र.रू.अठरा लाख छत्तीस हजार फक्त) येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८४४४ विषय क्रमांक – १७

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/६६०/२०२१, दि.०८/०२/२०२१

विषय - सन 2020-21 करिता प्रभाग क्र.१६ मध्ये मामुर्डी भागातील डांबरी रस्त्याची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणेबाबत.

विषय क्र.१७ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.उप आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभा/०४/कावि/१११/२०२१, दि.०९/०१/२०२१

मा.उप आयुक्त(भांडार) यांची शिफारस विचारात घेवून –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक जंतुनाशक/दुर्गधीनाशक युक्त मॅलेथिऑन 5 टक्के डी.पी. तृणनाशक पावडर खरेदीकरणे कामी ई.नि.सु.क्र.20-01/2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.डॉल्फीन सेल्स,पुणे यांचे प्रती बॅग दर र.रु.1395/- नुसार 1521 बॅगसाठी एकुण र.रु.21,21,795/-(अक्षरी र.रू.एकवीस लाख एकवीस हजार सातशे पंच्यान्नव फक्त) प्राप्त झाले असुन प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.21,29,400/- पेक्षा 0.71% ने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेची मा.उप आयुक्त(भांडार) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत प्रकरणी मे.डॉल्फीन सेल्स पुणे यांचे दुर्गधीनाशक/ जंतुनाशक/ किटकनाशक मॅलिथिऑन 5 टक्के डी.पी.तृणनाशक पावडर या साहित्याचे दर र.रू.प्रती २५ किलो बॅगचे एकूण १५२१ बॅगसाठी नजचुकीने टायपिंग मिस्टेक मुळे र.रू.१३९५ असे नमूद झालेले असून त्याऐवजी कमी करून दिलेली प्रती बॅग दर र.रू.१३९० प्रती २५ किलो बॅग प्रमाणे एकूण १५२१ बॅगसाठी र.रू.२१,१४,१९०/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख चौदा हजार एकशे नव्वद फक्त) अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४६ विषय क्रमांक – १९

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.उप आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभा/६/कावि/११७/२०२१, दि.०९/०२/२०२१

मा.उप आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागासाठी आवश्यक विविध किरकोळ साहित्य खरेदी करणेकामी ई.नि.सू.क्र.17/2020-21 अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाधारक मे.ब्राईटशाईन असोसिएट्स यांचे बाब क्र.1 एकुण 01 बाबी साहित्याचे दर एकुण र.रू.3,25,000/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.4,95,000/- दरापेक्षा -34.34% ने कमी आहेत व तसेच मे.स्टार एंटरप्रायजेस यांचे बाब क्र.2 एकुण 01बाबी साहित्याचे दर एकुण र.रू.10,788/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.11,748/- दरापेक्षा -8.17% ने

कमी आहेत. याप्रमाणे एकुण बाब क्र.1 ते 2 या 02 बाबी साहित्याचे लघुत्तम एकुण दर र.रू.3,35,788/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.5,06,748/- पेक्षा -33.74% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर करारनामा करुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेची कार्यवाही करणेत आली आहे. याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73(ड) नुसार अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४७ विषय क्रमांक – २०

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – उद्यान

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/६९/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.४/२०२०-२१ काम क्रमांक २ अन्वये मनपाचे ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२४ व २७ मधील विविध उद्याने देखभाल करणे कामाबाबत मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. या ठेकेदारांची निविदा र.रू.७१,१२,६४०/- (अक्षरी र.रु.एकाहत्तर लाख बारा हजार सहाशें चाळीस फक्त) पेक्षा -२७.१५ % कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.५१,८१,५५८/- (अक्षरी र.रु.एकावन्न लाख ऐक्याऐंशी हजार पाचशें अठठावण्ण फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४८ विषय क्रमांक – २१

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – उद्यान

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/६८/२०२१, दि.०८/०२/२०२१

विषय - मनपाचे ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.३२ मधील विविध उद्याने देखभाल करणेबाबत..

विषय क्र.२१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४४९ विषय क्रमांक – २२

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – झोनिपु, स्थापत्य

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२४/२०२१, दि.०८/०२/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २३) मधील कामाचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे भाववाढ कलम लागू असल्यास,भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनगारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर

कामाचा करारनामा करून कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५० | विषय क्रमांक – २३

दिनांक – १७/०२/२०२१ | विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभि.(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/१५३/२०२१, दि.०५/०२/२०२१

मा.सह शहर अभि.(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.23/4-2019/20 अन्वये प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी येथील नेत्र रुग्णालय येथे सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकामी मे.वैभव टेक सोल्युशन्स प्रा.लि नि.र.रू.40,17,844/- (अक्षरी र.रू.चाळीस लाख सतरा हजार आठशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा 3.50% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५१ | विषय क्रमांक – २४

दिनांक – १७/०२/२०२१ | विभाग – भूमि आणि जिंदगी

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.भूजि/३/कावि/२२/२०२१, दि.०९/०२/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मासुळकर कॉलनी पिंपरी भाजी मंडईमध्ये एकुण ६० गाळे आहेत. सदर गाळे वितरणाकामी अनेकवेळा प्रयत्न करणेत आले आहेत. तथापी त्यास प्रतिसाद मिळालेला नाही. श्री.विलास पांडुरंग कुटे, आदर्श शेतकरी आठवडे बाजार, कृषीजीवन अँग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं.लि. यांनी अजमेरा, मासुळकर कॉलनी येथील भाजी मंडई मधील गाळे मिळणेस विनंती केलेली आहे. रेडीरेकनर नुसार येणारे भाडेदर त्यांना मान्य असलेबाबत कळविले आहे. मा.उपसंचालक न.र.वि. यांचेकडिल पत्र क्र.नरवि/कावि/१५/१६८/२०१९ दि.२४/०५/२०१९ अन्वये सदर गाळेंसाठी मासिक भाडे (चटई क्षेत्रफळानुसार) र.रू.२९.५५ प्र.चौ.फूट (मनपा कराव्यति) भाडे दर कळविला आहे. त्यानुसार प्रति गाळा मासिक भाडेदर र.रू.१,२१२/- येत आहे. श्री विलास पांडुरंग कुटे, आदर्श शेतकरी आठवडे बाजार,कृषीजीवन अँग्रो फार्मर्स प्रोड्युसर कं.लि. यांनी केलेल्या मागणीनुसार गाळे/ओटे वितरण करण्याचे प्रस्तावित आहे. सबब महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७९ ब नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर मंडईचे मिळणारे मासिक व वार्षिक उत्पन्न खालील प्रमाणे

| अ.क्र. | मंडईचे नांव | एकुण ओटे/गाळे | मनपा भाडेदर प्रती गाळा /प्रती महा | एकुण मासिक उत्पन्न | एकुण वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | मासुळकर कॉलनी भाजी मंडई | ६० | र.रू.१,२१२ | ६० x १२१२ =७२,,७२० | ८,७२,६४०/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५२ विषय क्रमांक – २५
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.ढामाबाई बारणे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१२५/२०२१, दि.०९/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.38/22/2020-21 अन्वये प्रभाग क्र.७ भोसरी येथील म.न.पा. इमारतींची दुरूस्ती व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी मे.फेलोशिप ग्रुप नि.र.रू.44,99,216/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख नव्व्याण्णव हजार दोनशे सोळा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,87,516/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,87,516/- पेक्षा 27.27% कमी म्हणजेच र.रु.32,63,770/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.9,611/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.11,700/- = एकुण र.रु.32,85,081/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५३ विषय क्रमांक – २६
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – उद्यान
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/७५/२०२१, दि.०९/०२/२०२१

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.५/२०२०-२१ अन्वये मनपाचे पॉलीहाऊस प्रकल्प उद्यान, तळवडे देखभाल करणे कामाबाबत मे.दिशा स्वयंरोजगार संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.३४,४२,६०८/- (अक्षरी र.रु.चौतीस लाख बेचाळीस हजार सहाशें आठ फक्त) पेक्षा -४.२३% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.३२,९६,९८५/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख श्याण्णव हजार नउशें पंच्याऐंशी फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५४ विषय क्रमांक – २७
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ह क्षेत्रिय
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/६५६/२०२१, दि.०९/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील मनपाची प्राथमिक व माध्यमिक शाळा बांधणेसाठी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची दरसूची दि.०७/१२/२०२० ते दि.१७/१२/२०२० रोजी मागविण्यात

आल्या आहेत. त्यानुसार मे.नियोजन कन्सल्टंट्स यांनी १.९८% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर कामासाठी मे.नियोजन कन्सल्टंट्स यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्चात १.४८% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.९८% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५५ विषय क्रमांक – २८

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ह क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/६५७/२०२१, दि.०९/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.२० महेशनगर चौकातील मोकळ्या जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणेसाठी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची दरसूची दि.०७/१२/२०२० ते दि.१७/१२/२०२० रोजी मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार मे.शेलस्पेस डिझाईन स्टुडिओ यांनी १.४०% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर कामांसाठी मे.शेलस्पेस डिझाईन स्टुडिओ यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्चात ०.९०% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.४०% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५६ विषय क्रमांक – २९

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३७/२०२१, दि.१०/०२/२०२१

विषय - प्र.क्र.२६ पिंपळे निलख गावठाण परिसरात ठिकठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.२९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४५७ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३३/२०२१, दि.१०/०२/२०२१

विषय - प्र.क्र.२३ मध्ये नाल्यांना बेडींग करणे, भिंतीची दुरुस्ती करणे व इतर अनुषंगीक कामे करणेबाबत.

विषय क्र.३० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –८४५८ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/१३४/२०२१, दि.१०/०२/२०२१

विषय - प्र.क्र.२६ पिंपळे निलख येथील विशालनगर, जगताप डेअरी व परिसरात ठिकठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.३१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक –८४५९ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य ग मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ग-मुख्य/१३५/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/50/72/2020-21 अन्वये प्र.क्र.२७ मधील विविध भागामध्ये रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन नि.र.रू.41,26,533/- (अक्षरी र.रु.एकेचाळीस लाख सव्वीस हजार पाचशे तेहतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,60,133/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,60,133/- पेक्षा 27.27% कमी म्हणजेच र.रु.29,52,935/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.32,367/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.66,400/- = एकुण र.रु.30,51,702/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक –८४६० विषय क्रमांक – ३३

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१३०/२०२१, दि.१०/०२/२०२१

विषय - प्रभाग क्र.५ मधील मनपाच्या इमारती व आरक्षणाचे सुधारणा करणेबाबत.

विषय क्र.३३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४६१ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१३१/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.38/14/2020-21 अन्वये प्रभाग क्र.५ मधील दुर्गामाता कॉलनी व हनुमान कॉलनी परिसरात ठिकठिकाणी नवीन पेव्हिंग ब्लॉक बसविणे व पेव्हिंग ब्लॉकची सुधारणा करणेकामी मे.व्ही.ए.झोंबाडे नि.र.रू.29,99,987/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्व्याण्णव हजार नऊशे सत्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,68,037/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,68,037/- पेक्षा 28.00% कमी म्हणजेच र.रु.21,36,987/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.43,082/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.31,950/- = एकुण र.रु.22,12,019/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४६२ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१३२/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.38/17/2020-21 अन्वये प्रभाग क्र.५ मधील गवळीनगर व इत्यादी ठिकाणी नवीन पेव्हिंग ब्लॉक बसविणे व पेव्हिंग ब्लॉकची सुधारणा करणेकामी मे.डी.एस.कुलकर्णी नि.र.रू.44,99,959/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख नव्व्याण्णव हजार नऊशे एकोणसाठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,68,009/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,68,009/- पेक्षा 29.86% कमी म्हणजेच र.रु.31,33,862/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.33,931/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.31,950/- = एकुण र.रु.31,99,743/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४६३ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१३३/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

6. सदर नळजोडाचे पाणी बील देहुरोड कॅन्टोमेंट बोर्डास प्रत्येक महिन्यास देण्यात येईल प्रत्येक बिलाची रक्कम महिना संपण्यापुर्वी देणेत यावी उशिर झाल्यास १० टक्के प्रतिवर्ष या दराने बिलावर व्याज आकारणी करणेत येईल.

7. म.न.पा.ने ठरवुन दिलेल्या मर्यादेपेक्षा पाण्याचा अतिरिक्त वापर झालेस अतिरिक्त पाण्याच्या परिणामाचे देयक मंजुर दराच्या दुप्पट दराने आकारणेत येईल.

1. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांना खालील परिस्थितीत नळजोड खंडीत करण्याचे अधिकार राहतील.

1. विहीत मुदतीत पाणीपट्टी भरणा न झालेस

2. नळजोडास मीटर नसल्याचे किंवा असलेला मिटर नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आलेस

3. मनपाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा पाण्याचा अतिरिक्त वापर झालेस

तरी मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅन्टोमेंट बोर्ड देहुरोड यांचे नावे पाण्याच्या नळजोडाचा व्यास ६" मंजुर करणे व घरगुती वापरासाठी पाण्याचा दर हा प्रती युनिट (हजार लिटर) र.रु.१६.५४ तसेच एकुण पाण्यापैकी ५ टक्के पाण्याचा वापर व्यापारी गृहित धरून त्यासाठीचा प्रति युनिट दर (हजार लिटर) र.रु.५५.१३ आकारणेकामी तसेच या दरामध्ये दरवर्षी ५ टक्के वाढ करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील घरगुती वापरासाठी पाण्याचा दर हा प्रतियुनिट (हजार लि) र.रू.१०/- इतका आकारण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४९५ विषय क्रमांक – ६८
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – अ क्षेत्रिय, पाणीपुरवठा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/कावि/१५२/२०२१, दि.१२/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पर्यावरण विभागाकडील नि.नो.क्र.03/13/2020-2021 अन्वये पिं.चिं. मनपा परिसरातील पवना नदी पुर्नरुज्जीवन प्रकल्प राबविणे अंतर्गत विविध ठिकाणी संप-पंप हाऊस बांधणे व इतर संलग्न कामे करणेकामी मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नि.र.रू.14,09,81,331/- (अक्षरी र.रू. चौदा कोटी नऊ लाख ऐक्याऐंशी हजार तीनशे एकतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.14,09,75,402/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.14,09,75,402/- पेक्षा 3.00% जादा म्हणजेच र.रु.14,52,04,664/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.5,929/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.14,52,10,593/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४९६ विषय क्रमांक – ६९
दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – उद्यान
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/७७/२०२१, दि.१०/०२/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.42/3/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२७ मधील विविध उद्यानांची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.सुनिल अण्णाप्पा सुर्यवंशी नि.र.रू.29,98,214/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख अठ्याण्णव हजार दोनशे चौदा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,60,914/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,60,914/- पेक्षा 27.00% कमी म्हणजेच र.रु.21,61,467/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.25,536/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.37,300/- = एकुण र.रु.22,24,303/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४९७ विषय क्रमांक – ७०

दिनांक – १७/०२/२०२१ विभाग – पाणीपुरवठा मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/८००/२०२०, दि.१२/०२/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.16/01/2020-21 अन्वये Augmentation and capacity enhancement of the existing water treatment plant at Sec-23 Nigdi Including Operation and Maintenance for two years and carrying out all necessary allied works (civil, electromechanical instrumentation etc. complete) कामी मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. नि.र.रू.35,77,46,364/- (अक्षरी र.रू.पस्तीस कोटी सत्याहत्तर लाख शेहेचाळीस हजार तीनशे चौसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.35,73,77,164/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.35,73,77,164/- पेक्षा 7.95% जादा म्हणजेच र.रु.38,57,88,649/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.7,49,795/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.3,69,200/- = एकुण र.रु.38,69,07,644/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४९८ विषय क्रमांक – ७१

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अनुराधा गोफणे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव -

मा.विधी समिती सभा ठराव क्र.२० दि.०५/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मा.विधी समिती सदस्यांना कायदा सुव्यवस्थेची पाहणी करण्याकरिता अभ्यास दौ-याचे आयोजन केले जाते. या अभ्यास दौरा करण्याकरिता सिक्किम या राज्यातील कायदा व्यवस्थेची पाहणी करणेकरिता मा.विधी समिती सभापती व सन्मा. सदस्य तसेच संबंधित अधिकारी यांचा सिक्किम या राज्यात अभ्यास दौरा आयोजित करणेस व याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८४९९ विषय क्रमांक – ७२

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव विचारात घेवून -

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.२५ दि.०४/०२/२०२१ अन्वये प्राथमिक शिक्षण विभागाकडील शाळांमधील बालवाडीचे एक वर्गखोली प्रायोगिक तत्वावर अपग्रेडेशन (आधुनिकीकरण) करणेबाबत नियोजित आहे. सदर वर्गखोली मध्ये क्लासरुम २० X २० असुन

लहान मुलांना वर्गाचे आकर्षण निर्माण होईल, वर्गखोलीचे रंगसंगती, वातावरण, सुसज्ज अशा प्रकारे असावी, यामध्ये वर्गाची पीओपी, पेटींग करणे, नव्याने प्लोरिंग करणे, वर्गखोलीचे वातावरण लहान मुलांना आवडेल असे चांगले व सुसज्ज करणे, मोडयुलर स्टोअरेज करणे, विद्यार्थ्यांची पुस्तके, खेळणी, डब्बे, बॅग इ. ठेवणेकामी व्यवस्थित जागा, रॅक करणे, शिक्षकांसाठी टेबल, खुर्ची, व्यवस्था सुसज्ज अशी नव्याने आकर्षित रंगसंगतीसह वर्गखोली प्रायोगिक तत्वावर निर्माण करणे वरीलप्रमाणे कामकाजासाठी प्रायोगित तत्वावर नव्याने १ बालवाडी वर्गखोली प्रायोगिक तत्वावर अधुनिकीकरण करण्याकामी र.रु.३,५०,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख पन्नास हजार फक्त) खर्च येणार आहे. तरी प्रायोगिक तत्वावर १ बालवाडी वर्गखोलीचे अधुनिकीकरण करणेकामी मे.रेखा इंजिनिअरींग यांचेकडून कामकाज थेटपध्दतीने करुन घेण्यास त्याच अनुषंगाने तीन शाळा १) भोसरी प्राथमिक शाळा २) कासारवाडी प्राथमिक शाळा ३) मोशी प्राथमिक शाळा करण्यात करणेकामी तसेच याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्यांची मागणी असली तरी, प्रस्तूत विषय प्रशासनाने तपासून योग्य तो आर्थिक मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०० विषय क्रमांक – ७३

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव विचारात घेवून -

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.२६ दि.०४/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणार विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेंच्या प्रमाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करणेकरिता व मनपा शाळेची पट संख्या वाढविणेकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने सर्व प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ८ वीतील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज विज्ञान प्रयोग शाळा तयार केल्यास त्याचा अभ्यासाठी उपयोग होईल तसेच त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होईल. तरी याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्यांची मागणी असली तरी, प्रस्तूत विषय प्रशासनाने तपासून योग्य तो आर्थिक मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०१ विषय क्रमांक – ७४

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव विचारात घेवून -

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.२७ दि.०४/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणार विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेंच्या प्रमाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये

शैक्षणिक गुणवत्ता वाढ करणेकरिता व मनपा शाळेची पट संख्या वाढविणेकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्यकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. मनपा विद्यार्थ्यांनींच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी दरम्यान वापरल्या जाणा-या पॅड वापराचे प्रमाण अत्यल्प आहे. पॅड वापरायचे प्रमाण खुपच कमी आहे. त्यामुळे हे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच वापरल्या जाणा-या पॅडचे विघटन होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सॅनिटरी नॅपकिन व्हेंडींगच्या वापरातून अल्प दरात उत्तम दर्जाचे नॅपकिन उपलब्ध करून घेता येईल. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात पॅड वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी मदत होईल. व नॅपकिन विघटनाची नियोजन सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशिनमार्फत करणेकामी मशीन खरेदी करिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्यांची मागणी असली तरी, प्रस्तूत विषय प्रशासनाने तपासून योग्य तो आर्थिक मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०२ विषय क्रमांक – ७५

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव विचारात घेवून –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.२८ दि.०४/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्रातील विकासाभिमुख काम करण्यासाठी नेहमीच कार्यशील असते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून आजपर्यंत वेगवेगळे उपक्रम राबविल्याचे दिसून येते यातून प्रेरणा घेवून महिला आरोग्य व सार्वजनिक स्वच्छता या विषयावर काम करण्यासाठी अभिनव संकल्पना वापरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून पालिकेच्या शिक्षण विभागा अंतर्गत असणा-या सर्व पालिकेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्या द्ष्टीने Covid-19 च्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित (Automatic) हॅन्ड सॅनिटायझर मशीन ही नवीन संकल्पना सादर करणेस मान्यता देण्यास व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत एकूण ६५२ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आहेत. त्यात काही खाजगी व अनुदानित व विनाअनुदानित शाळांची संख्या आहेत. एकंदरीत पिं.चिं.मनपा पालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक असे दोन्हीही मिळून १२८ शाळा आहेत. पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळा संख्या ११० असून यामध्ये एकूण वर्ग खोल्यांची संख्या ११२६ असून त्यामध्ये असणा-या स्वच्छतागृहांची संख्या देखील ८९७ असून या ठिकाणी (Automatic) हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविता येईल. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेता येईल. पि.चि.म.न.पा. माध्यमिक शाळांची संख्या १८ असून या यामध्ये एकूण वर्गखोल्यांची संख्या २४३ आहेत त्यामध्ये असणा-या स्वच्छतागृहांची संख्या २५१ असून या ठिकाणी देखील (Automatic) हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविणे गरजेचे आहे.

| | शाळांची संख्या | वर्ग खोल्यांची संख्या | स्वच्छतागृहांची संख्या |
|---|---|---|---|
| प्राथमिक | ११० | ११२६ | ८९७ |
| माध्यमिक | १८ | २४३ | २५१ |
| एकूण | १२८ | ११४८ | १३६९ |

वरील आकडेवारी विचारात घेता प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्गखोल्यांमध्ये व स्वच्छतागृहांमध्ये (Automatic) हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविल्यास “COVID 19“ या रोगाचा सामना करताना पालिकेतर्फे चांगली व्यवस्था करता येईल व शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचे आरोग्य जपता येईल. तरी याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्यांची मागणी असली तरी, प्रस्तूत विषय प्रशासनाने तपासून योग्य तो आर्थिक मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०३ विषय क्रमांक – ७६

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.भाऊसाहेब भोईर, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.३३ दि.०४/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील ग्रामीण भागातील,विटभट्टी कामगारांची मुले यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विदयार्थी वाहतुक बस सुविधा सुरु करण्यात आली होती. त्याअनुषंगाने मे.प्रेम टुर्स ॲण्ड ट्रव्हल्र्स, च-होली यांना निविदा नोटीस क्र.२४/२०१९ अन्वये आठ प्राथमिक शाळेतील विदयार्थी वाहतुक बस सुविधा पुरविणेचे एप्रिल-२०२० पर्यंत कामाचे आदेश दिले होते. परंतु भारतामध्ये कोरोना संसंर्गजन्य रोग प्रादुर्भाव झाल्याने मार्च-२०२० पासून पिंपरी चिंचवड शहरामध्ये लॉकडाऊन लागू करण्यात आले. शाळा बंद झाल्याने त्यांचे काम देखील बंद करण्यात आले आहे. सदयस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या आदेशान्वये व पिं.चिं.मनपाचे मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये दि.४/०२/२०२१ पासून इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या शाळा सुरु होणार असून मे. प्रेम टुर्स ॲण्ड ट्रव्हल्र्स यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या उर्वरित कामाचे कालावधीसाठी मागील मंजूर दराने निविदा क्र.२४/२०१९ च्या अटी-शर्ती, करारनामा व मंजूर दरानुसार काम करण्यास तयार असून कामाचे आदेश देणेकामी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच शाळेच्या मुख्याध्यापक यांनी विदयार्थी बस सुविधा पुरविणे बाबत मागणी केली आहे. त्याअनुषंगाने मे. प्रेम टुर्स ॲण्ड ट्रव्हल्र्स, च-होली यांना कामाचा अनुभव, माहिती असल्याने नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ सुरु होईपर्यंत. नव्याने निविदा न काढता पुर्वीच्या निविदा क्र.२४/२०१९ च्या अटी-शर्ती, करारनामा व मंजूर दरानुसार फक्त निविदेमध्ये मंजूर असलेल्या शाळेतील इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विदयार्थी-विदयार्थीनी करीता १) कै.बबनराव भोंडवे प्राथमिक शाळा, रावेत २) कै.दिलीपराव ढवळे प्राथमिक शाळा मुले/मुली, पुनावळे शाळा क्र.१०३, ३) सावित्रीबाई फुले मुले/कन्या प्राथमिक शाळा क्रमांक १०६ मोशी ४) पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळा चोविसावाडी शाळा क्र.२१ चोविसावाडी ५) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा, यशवंतनगर ६) छत्रपती श्री.शाहु महाराज प्राथमिक विदयालय दिघी ता.हवेली जि.पुणे या सहा शाळेतील विदयार्थी-विदयर्थीनी यांची बस वाहतुक सुविधा पुरविणेचे सन २०१९-२० मधील निविदेतील उर्वरित कालावधीचे कामकाज सन २०२०-२१ मध्ये करण्यास तसेच मे.प्रेम टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्र्स, च-होली यांना विदयार्थी वाहतुकीचे कामास त्यापुढे ३ महिने मुदतवाढ देण्यात येऊन कामाचे आदेश देणेकामी होणारे अंदाजे वाढीव खर्च र.रु.१२,००,०००/-(अक्षरी र.रु.बारा लाख फक्त) चे खर्चास व

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाचे उर्वरित कालावधीसाठी विदयार्थी वाहतुक सुविधा चालू ठेवण्यास नव्याने निविदा प्रकिया करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०४ विषय क्रमांक – ७७

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.३४ दि.०४/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषगाने विद्यार्थांच्या कला गुणांना वाव देण्याचे कामकाज शिक्षण समिती करण्याचे दृष्टीने स्वरधरा संस्थेमार्फत संगीत शिक्षण – प्रयोगिक तत्वावर ऑनलाइन पद्धतीने सुरु करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत संस्थेने विभागास प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर उपक्रम राबविल्यास विद्यार्थांना त्यांचा फायदा होईल.

**सर्व विद्यार्थ्यांना APP उपलब्ध करून देणे –**

APP गूगल प्ले स्टोर वर उपलब्ध आहे. त्याचे संकेत स्थळ सर्व विद्यार्थ्यांना देण्यात येईल. APP डाऊनलोड केले की त्यातील वॉल्यूम 1 वापरुन पहिल्या वर्षाचे शिक्षण मुलांना घ्यायचे आहे. वॉल्यूम 1 मिळण्यासाठी प्रत्येक मुलाला एक कोड दिला जाईल. त्या कोड च्या आधारे वॉल्यूम 1 माधिले अभ्यासक्रम खुला होऊन विद्यार्थ्यांना धड्याच्या रूपाने पुस्तकाची पाने आणि स्वर-ताल बद्धं ध्वनि मुद्रण मिळेल.

**सध्याच्या मनपा संगीत शिक्षकांना APP मधील अभ्यासक्रम समजावून सांगणे**

शिक्षकांना संपूर्ण अभ्यासक्रम आणि धडे समजावून सांगण्यात येईल. एका ऑनलाइन मीटिंग आणि ट्रेनिंग द्वारे. संगीत त्यांना येतच आहे, प्रत्येक धड्यातील मुद्दे आणि ते मुलांकडून करून घेण्याची पद्धत आपण ह्या मीटिंग मध्ये सगळ्या शिक्षकांना समजविण्यात येईल. व काही शंका असल्यास त्याचे निरसन करण्यात येईल. त्या आधारे शिक्षक मुलांना प्रती धडा अर्धा तास लाईव्ह किंवा रेकॉर्ड करून पाठवू शकतील सवडी प्रमाणे बघून शिकायला, मग लाइव्ह ची पण गरज नाही. स्वाध्या या प्रमाणे मुलांनी तो अभ्यास पूर्ण करून, गरज असेल तसे शिक्षकांना रेकॉर्ड करून पाठवणे सहज शक्य आहे. सदर उपक्रमास स्वरधारा संस्थेने र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) इतका खर्च कळविला असून सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०५ विषय क्रमांक – ७८

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.प्रियांका बारसे, मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव विचारात घेवून –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.३५ दि.०४/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थांकरिता ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा वापर केल्यास विद्यार्थांना त्याचा चांगला फायदा होईल. "ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीमध्ये" प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थाना शिक्षण देण्यासाठी आवश्यक असलेले सर्व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच "ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीमध्ये" म्हणी, वाक्यप्रचार, चित्र खेळणे, भिंतीचित्रे संवादातून विद्यार्थांना शिक्षण दिले जाते. केंद्र सरकारने ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा उल्लेख २००५ च्या राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखड्याद्वारे सर्वप्रथम तसेच "ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा" वापर अध्ययन-अध्यापनात झाला पाहिजे हा आग्रह २००९ च्या शिक्षण हक्क कायदानुसार धरला आहे. तत्ससंबंधीचा २२ जून २०१५ चा शासन निर्णय हा शिक्षक व केंद्रप्रमुख यांच्यावर मुलांच्या शिकण्याची जबाबदारी टाकतो. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थांकरिता "ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धतीचा" वापर केल्यास त्याचा फायदा विद्यार्थांना होईल व त्याची शिक्षणाची ओढ वाढेल. त्यासाठी ज्ञानरचनावादी सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यास व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सदस्यांची मागणी असली तरी, प्रस्तूत विषय प्रशासनाने तपासून योग्य तो आर्थिक मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करणेस मान्यता येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८५०६ विषय क्रमांक – ७९

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.महापालिका आयुक्त यांचे विषय क्र.पअक/१/कावि/१४१/२०२१ दि.१०/२/२०२१ नुसार पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/२०१६-२०२१ अन्वये मोशी कचरा डेपोतील जुन्या डंपींग केलेल्या कच-याची बायोमायनिंग करणेची निविदा भरणेसाठी जॉईंट व्हेंन्चर्स करून दोन कंपन्यांनी मिळून संयुक्तपणे निविदा भरणेची तरतूद करणेत आली होती, त्यानुसार सदरची निविदेसाठी लघुत्तम दराची निविदा मे.हिंद अग्रो अँन्ड केमिकल्स व मे.साई गणेश एन्टरप्रायझेस यांनी भरली असून सदरचे निविदेस मा.स्थायी समितीची ठराव क्र.८४१५ दि.१०/२/२०२१ नुसार मान्यता मिळाली असून सदरच्या विषयपत्रामध्ये दोन संयुक्त कंपनीचे नाव

असणे अपेक्षित होते. तथापि नजरचुकीने दोन्हीपैकी फक्त मे.हिंद अग्रो अँन्ड केमिकल्स यांचेच नाव नमुद केल्याने तसा ठराव पारित झाला आहे. सदरचा प्रकल्प दोन्ही कंपनीकडून संयुक्तरित्या (JV) करण्यात येणार असल्याने त्यांचेशी करारनामा करताना किंवा भविष्यात तांत्रिक अडचण येऊ नये यासाठी यापुर्वीच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.८४१५ दि.१०/२/२०२१ च्या ठरावात दुरूस्ती करून एजन्सीचे नाव मे.हिंद अग्रो अँन्ड केमिकल्स ऐवजी मे.हिंद अग्रो अँन्ड केमिकल्स व मे.साई गणेश एन्टरप्रायझेस असा उल्लेख करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०७ विषय क्रमांक – ८०

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण ६ सार्वजनिक वाचनालये व २ स्पर्धा परिक्षा केंद्र चालविण्यात येत आहेत यापैका १ वाचनालय अनुदानित असून २ वाचनालये बचत गटास चालविण्यास देणेत आलेली आहेत उर्वरीत ०३ वाचनालये महापालिकेमार्फत चालविण्यात येत आहेत. सध्यास्थितीमधे वाचनालयात कार्यरत कर्मचारी वर्गावर मनपाचा होणारा खर्च पाहता वाचनालये बचत गटास सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिलेनंतर कर्मचारी वर्गावर होणारा खर्च कमी होईल. त्यानुसार अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत चालविण्यात येणारे निगडी सार्वजनिक वाचनालय मैत्री महिला बचत गट व आकुर्डी सार्वजनिक वाचनालय सहेली महिला बचत गट यांना प्रती महिना एका वाचनालयाकरिता र.रू.१०,०००/- (अक्षरी र.रू.दहा हजार फक्त) याप्रमाणे सेवाशुल्क तत्वावर चालविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०८ विषय क्रमांक – ८१

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दरवर्षी जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे यावर्षी देखील ८ मार्च २०२१ या जागतीक महिला दिनाचे आयोजन करण्यास व त्याकामी येणा-या र.रू.६,००,०००/- (अक्षरी र.रू,सहा लाख फक्त) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५०९ विषय क्रमांक – ८२

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

सारिका रविंद्र कुलकर्णी यांना शॉप नं.१, दैदिप्यमान अपार्टमेंट,तानाजीनगर, चिंचवड

येथे महापालिकेचे नागरी सुविधा केंद्र मंजूर केलेले आहे. सारिका रविंद्र कुलकर्णी, अध्यक्षा सुनेत्रा महिला बचत गट, तानाजीनगर चिंचवड यांनी शॉप नं.२१, मनपा व्यापारी गाळे इमारत, मोरया हॉस्पीटल समोर, लिंक रोड, चिंचवड-३३ हा गाळा १० वर्षे भाडेकराराने मनपाकडून घेतला आहे. त्यामुळे तानाजीनगर, चिंचवड येथील नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने सदरचे नागरी सुविधा केंद्र शॉप नं.२१, मनपा व्यापारी गाळे इमारत, मोरया हॉस्पीटल समोर, लिंक रोड, चिंचवड-३३ या ठिकाणी स्थलांतर करणेस तसेच सुनेत्रा महिला बचत गटास सदर ठिकाणी गाळा क्र.२० मध्ये पणन केंद्र व महाराष्ट्र शासनाची शिवभोजन थाळी योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५१० विषय क्रमांक – ८३

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्रमांक १४ दिनांक १६/०२/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित अघोषित झोपडपट्टीवासियांना त्यांचे आरोग्य हे उत्तम राहण्याकरीता तसेच त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्यमान व जीवनमान आरोग्यदृष्टया उत्तम राहणे ही महानगरपालिकेची पालक म्हणुन प्राथमिक जबाबदारी असलेने झोपडपट्टीवासियांच्या घरामध्ये सोलर होम लाईटचा (ग्रीन एनर्जी) पर्यावरणदृष्टया प्रवाह होणे गरजेचे असून महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण मार्फत तयार होणा-या विजेचा वापर कमी होईल तसेच त्यातुन निर्माण होणारा प्रदुषण वायू पासून म्हणजेच $CO2$ (कार्बन), Nox, Sox यापासून तेथील रहिवाशाचा बचाव होईल. घराच्या छपरावर सोलर पॅनेल उभारुन त्याव्दारे सोलर फोटो व्होल्टाइक पॅनेल व्दारे वीजनिर्मिती केली जाते. यामध्ये निर्माण झालेली वीज थेट महावितरणच्या जाळयाला (ग्रीड) ला जोडली जाऊ शकते. यातुन भारनियमन बंद होईलच शिवाय विजेचे मासिक बिल अत्यंत कमी प्रमाणात येईल. त्यासाठी प्रत्येक झोपडपट्टीतील कुटुंबाना प्रत्येकी १ सोलर होम लाईट सेट म्हणजे २ टयुब लाईट, १ फॅन चालविण्यासाठी सोलर पॅनल तसेच बॅटरी बॅकअप, इनव्हरटर व १ पोल कार्यान्वीत करुन देण्यात यावा. सदरचे काम करणेसाठी Broadcast Engineering Consultants India Limited अथवा Savitiribai Phule Pune University या संस्थेस थेट पध्दतीने देण्यात यावे. सदरची खरेदी महानगरपालिकेच्या शहर सुधारणा विभागाअंतर्गत झोपडपट्टीमध्ये काम करणा-या विदयुत विभागामार्फत करण्यात यावी. तसेच शहर सुधारणा विभागा अंतर्गत येणा-या लेखाशिर्षावरील अ.क्र. १) महसुली – झोनिपु स्थापत्य विभाग किरकोळ दुरुस्ती व देखभाल पान क्र.९१७ ते ९४८, २) महसुली – विद्युत विभाग पान क्र.९४९ ते ९५३, ३) भांडवली- झोनिपु स्थापत्य पान क्र.५९८ ते ६०२, ४) भांडवली - विदयुत विभाग पान क्र.६३२ ते ६३६ यावरुन खर्च करण्यात यावा. तसेच सदर योजना पुर्ण करणेकामी शहर सुधारणा विभागातील तसेच इतर विभागातील अखर्चित रक्कम सदरच्या लेखाशिर्षावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात यावी. सदरचे साहित्य प्रायोगिक तत्वावर सुरुवातीला तीन झोपडपट्टया शांतीनगर, विठ्ठलनगर, दत्तनगर या झोपडपट्टीमधील सर्व कुटुंबाना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ८५११ विषय क्रमांक – ८४

दिनांक – १७/०२/२०२१

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

अ प्रभाग समिती सदस्यांना चंदिगड हे सुनियोजित विकसित शहर असल्याने त्या शहरातील महानगरपालिकेने राबविलेल्या विविध योजना व प्रकल्पांची पाहणी तसेच पर्यटन स्थळांची पाहणी व अभ्यास करुन त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये त्यातील चांगल्या योजना व प्रकल्पांची अंमलबजावणी करणेचे दृष्टीने अ प्रभाग समिती सदस्य व ३ अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता चंदिगड/ मनाली/ सिमला येथील विविध प्रकल्पांची पाहणी माहे मार्च/एप्रिल २०२१ मध्ये करणेकामीचे अभ्यास दौ-यास व त्यासाठी प्रत्यक्ष होणा-या खर्चास अ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ०५ दिनांक १२/०२/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तरी सदरचे अभ्यास दौ-यास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५१२ विषय क्रमांक – ८५

दिनांक – १७/०२/२०२१

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ :- मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

स्वच्छता अभियाना अंतर्गत फ प्रभाग समिती सदस्यांचा अभ्यास दौरा जम्मू आणि काश्मिर राज्यात माहे मार्च २०२१ मध्ये नियोजित करावयाचा आहे. सदरच्या दौ-यामध्ये शहर स्वच्छता, कचरा विल्हेवाट, घनकचरा व्यवस्थापन तसेच इतर प्रकल्प पाहणी, पर्यटन स्थळे पाहणी इ.बाबत जम्मू आणि काश्मिर राज्यातील महत्वाच्या शहरांना भेटी द्यावयाच्या असल्याने सदर दौ-यासाठी फ प्रभाग समिती सदस्य व चार अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास फ प्रभाग समिती ठराव क्रमांक २ दि.०४/०२/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली असल्याने सदरचे आभ्यास दौ-यास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ८५१३ विषय क्रमांक – ८६

दिनांक – १७/०२/२०२१

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ :- मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

सौ.श्रृतिका प्रथमेश मुंगी यांची माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये "सी.एस.आर.सहाय्यक सल्लागार" या पदावर दि.०१ ऑक्टोंबर २०२० पासून दि.३१ मार्च २०२१ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात दरमहा र.रु.४०,०००/-(अक्षरी र.रु.चाळीस हजार फक्त) एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधी करिता नियुक्ती करण्यात आली आहे. ६ महिन्यांचा कालावधीत सौ.श्रृतिका प्रथमेश मुंगी यांनी अनेक कंपन्यांच्या सी.एस.आर. मार्फत पालिकेच्या उपक्रमांना हातभार लावला व सी.एस.आर. मार्फत सामाजिक क्षेत्रातील नविन उपक्रम सुरु करण्यास योगदान दिले, तसेच चालू असलेले उपक्रम प्रामाणिकपणे व चांगल्या पध्दतीने चालविले आहेत. सदरहू कामाच्या आढाव्यानुसार सौ.श्रृतिका प्रथमेश मुंगी यांची माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये "सी.एस.आर. सहाय्यक सल्लागार" या पदावर दि.१ एप्रिल २०२१ पासून तात्पुरत्या स्वरुपात दरमहा र.रु.६०,०००/-(अक्षरी र.रु.साठ हजार फक्त)एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरिता नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत

आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ८५१४ विषय क्रमांक – ८७

दिनांक – १७/०२/२०२१

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ :- मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.२५ येथील पुनावळे गावठाण व्यायामशाळा ही रणखांब मित्रमंडळ, पुनावळे, कोयतेवस्ती, मा.मावळ, जि.पुणे या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर महापालिकेकडून दरमहा र.रु.२,०००/- घेऊन चालविणेस देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ८५१५ विषय क्रमांक – ८८

दिनांक – १७/०२/२०२१

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ :- मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समितीची दिनांक २४/०२/२०२१ ची सभा ही शुक्रवार दि.२६/०२/२०२१ रोजी सायं.५.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती,** स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/३८८/२०२१
दिनांक – २२/०२/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**(क्र.वायसीएमएच/७/कावि/१०७/२०२१ दि.०८/०२/२०२१ विषय क्र.१४ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

दिनांक-१८/०१/२०२१ व दि.२५/०१/२०२१ रोजी Walk In Interview करिता उपस्थित उमेदवारांमधून निवड केलेल्या खालील वरिष्ट निवासी-२ , कनिष्ठ निवासी-६, आय.सी.यु एम.ओ-२ व शिफ्ट ड्युटी-१ उमेदवारांची निवड यादी

प्रपत्र अ

(नेमणूक कालावधी दि. ०७/०२/२०२१ ते दि.०७/०६/२०२१ अखेर)

वरिष्ठ निवासी-

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | दरमहा मानधन र.रू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. सागर मोहनराव खोत | एम.बी.बी.एस<br>डी.एन.बी चेस्ट | खुला | खुला | मेडीसीन | ६५०००/- |
| २ | डॉ.मानसी मुकंद ठाकुर | एम.बी.बी.एस<br>एस.एस (गायनॅक) | खुला | इ.मा.व | गायनॅक | ६५०००/- |

## कनिष्ठ निवासी/आय.सी.यु एम.ओ/बीटीओ

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्ती विभाग | प्रति महिना मानधन र.रू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ निखिल दिलीप पिसे | एम.बी.बी.एस | इ.मा.व | इ.मा.व | मेडीसीन | ५५०००/- |
| २ | डॉ.मासूम सुरेश विरंजन | एम.बी.बी.एस | खुला | खुला | मेडीसीन | ५५०००/- |
| ३ | डॉ.प्रसाद विजय गायकवाड | एम.बी.बी.एस | खुला | खुला | मेडीसीन | ५५०००/- |
| ४ | डॉ.पुजा गणपत शेवाळे | एम.बी.बी.एस | खुला | खुला | मेडीसीन | ५५०००/- |
| ५ | डॉ.लक्ष्मीशंकर सुर्यबली यादव | एम.बी.बी.एस | खुला | इडब्ल्युएस | मेडीसीन | ५५०००/- |
| ६ | डॉ राजीव सुभाष देसाई | एम.बी.बी.एस | खुला | इडब्ल्युएस | मेडीसीन | ५५०००/- |
| ७ | डॉ.शितल माहेश्वराव खाडे | एम.बी.बी.एस | भ.ज-ड | अ.जा | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | ३५०००/- |
| ८ | डॉ.रिषिकेश राजेंद्र टकाडे | एम.बी.बी.एस | इ.मा.व | अ.ज | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | ३५०००/- |
| ९ | डॉ. सौरभ सुनेश शर्मा | एम.बी.बी.एस | खुला | इडब्ल्युएस | वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी | ३५०००/- |

आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/ ५८ /२०२१
दिनांक- ०७ /०२/२०२१ चे लगत

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

**(क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२४/२०२१ दि.०८/०२/२०२१ विषय क्र.२२ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८.

झोनिपु स्थापत्य विभाग,विषयपत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/ २४ /२०२१ दिनांक ५/०२/२०२१

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्र. | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग रक्कम वगळुन निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरीयल टेस्टिंग चार्जेस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे(+त्यावरील वस्तू व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| ०१ | मे.अमित नितीन गांधी | ०१/६७ २०१९-२० | प्रभाग क्र.१० इंदिरानगर झोपडपट्टीत पाथवेकरीता कॉक्रीट पेव्हिंग,कॉक्रीट ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | २६-११-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६५८/ २०२० | ०७/०१/२०२१ | ११९९६०८ | ११५२४१४ | ७५४४ | ३९६५० | २३.९९% कमी | ९,२३,१४४/- |
| ०२ | मे.सिध्दीविना-यक कंन्स्ट्रक्शन | ०१/९८-२०१९-२० | सन २०१९-२० मध्ये प्रभाग क्र.११ दुर्गानगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर पाथवेची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषांगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे.. | १९-१०-२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६४२/ २०२० | ०८/१२/२०२० | १४९२८१८ | १४३३४३८ | १०,४६० | ४९,००० | २९.५१% कमी | १०,६९,८९०/- - |
| ०३ | मे.सिध्दीविना यक कंन्स्ट्रक्शन | १/१०१-२०१९-२० | प्रभाग क्र.११ अंतर्गत झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी टाकलेल्या जल-वाहीनी व मलनिःसारण नलिकेवर कॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १९-१०-२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६५७/ २०२० | ०८/१२/२०२० | १४९१४९५ | १४३२०३५ | १०४६० | ४९,००० | २९.९५% कमी | १०,६२,६०१/- |
| ०४ | मे.सिध्दीविना -यक कंन्स्ट्रक्शन | १/१०५-२०१९-२० | सन २०१९-२० मध्ये प्रभाग क्र.१३ से.क्र.२२ इंदिरानगर,राजनगर,झोपड.-पट्टी मध्ये शौचालय गटर,पाथवेची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषांगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्ती करणे. | १९-१०-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६५५/ २०२० | ०८/१२/२०२० | २०६७७२७ | २००७६६८ | ११०५९ | ४९,००० | २८.८५% कमी | १४,८८,५१५/- |

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्र. | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग रक्कम वगळुन निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरीयल टेस्टिंग चार्जस | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे(+त्यावरील वस्तू व सेवा कर प्रचलित दराने अदा करणेत येईल. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| ०५ | मे.सिध्दीविनायक कंन्स्ट्रक्शन | १/१०६ २०१९-२० | सन २०१९-२० मध्ये प्रभाग क्र.१३ से.क्र.२२ संजयनगर,दळवीनगर,राहूलनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय,गटर पाथवेची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषांगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १९-१०-२०२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६५५/ २०२० | ०८/१२/२०२० | २०६७७२७ | २००७६६८ | ११०५९ | ४९,००० | २८.९९% कमी | १४,८५,७०४/- |
| ०६ | मे.सिध्दीविनायक कंन्स्ट्रक्शन | १/११२-२०१९-२० | प्रभाग क्र.१३ से.क्र.२२ येथे आवश्यक तेनुसार ठिकठिकाणी स्टॉर्म वॉटर पाईप टाकणे,गटर,पाथवे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १९-१०-२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६५२/ २०२० | ०८/१२/२०२० | १८६३२१६ | १८०३१५७ | ११०५९ | ४९,००० | २९.८५% कमी | १३,२४,९७४/- |
| ०७ | मे.सिध्दीविनायक कंन्स्ट्रक्शन | १/११३-२०१९-२० | सन १९-२० मध्ये प्रभाग क्र.१३ से.क्र. २२ संजयनगर,राजनगर,दळवीनगर इंदिरानगर,मिलींदनगर झोपडपट्टीमध्ये टाकलेल्या जलवाहिनी व मलनिःसारण नलिकेवर कॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य वि,यक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | १९-१०-२० | झोनिपु/स्था/नि/कावि/ ६५३/ २०२० | ०८/१२/२०२० | १९८४८३५ | १९२४७७६ | ११०५९ | ४९,००० | २९.९९% कमी | १४,०७,५९५/- |

सह शहर अभियंता
झोनिपु स्थापत्य विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.